




दैनिक

# अक्षराज

अचूक वेध, अचूक बातमी

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

**वर्ष : ०४**, अंक : ३६३
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.in
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, बुधवार, दि.१३ ऑगस्ट २०२५



**पाहिजेत !!** **राजेंद्र कुमार : ९४२२६७५१६४**

एखादे कुटुंब हवे आहे, जे शेती काम करतील. माझ्या घरातील व शेतीवरील कामात caretaker म्हणून काम पाहतील.

**प्रथम पगार रुपये ८,०००/- ते रुपये १५,०००/- प्रतिमाह**
**एका मुलाचा शालेय शिक्षण खर्च समाविष्ट**

गाईचा गोठा सर्व कामे : दूध काढणे, चारा देणे, गोठ्यात इतर कामे...
शेतीवरील काम : शेतीवरील कामात लक्ष देणे, पाणी पंप सुरू करणे व शेताला पाणी पुरवठा करणे, माणसे काम करतील ते पाहणे व ईतर काही कामे.

**राहण्याची सोय आहे... ५ वर्षे करार असेल...**
**गाव : लोणविरे तालुका : सांगोला जिल्हा : सोलापूर**


## नागपुरात तासभराच्या पावसाने रस्ते जलमय, वाहतूक ठप्प

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१२, नागपूर :** आठवडाभराच्या अवकाशानंतर मंगळवारी दुपारी शहरात दमदार पावसाने हजेरी लावली. उकाड्यापासून काहीसा दिलासा मिळाला असला तरी ठिकठिकाणी पाणी तुंबल्याने पुन्हा एकदा नागरिकांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागले. तुंबलेल्या पावसाळी वाहिन्यांमुळे रस्त्यांवर ठिकठिकाणी पाणी साचले. त्यामुळे या पाण्यातून वाहनचालकांना वाहने चालवताना चांगलीच कसरत करावी लागली.



जुलै महिन्याच्या शेवटी दमदार पावसाने हजेरी लावली होती. त्यानंतर पावसाने ब्रेक घेतला. त्यामुळे आकाश ढग असले तरी पाऊस होत नसल्याने उकाड्यातही चांगलीच वाढ झाली होती. दरम्यान मंगळवारी दुपारी आकाशात काळे ढग दाटून आले आणि शहरात मुसळधार पाऊस झाला. पावसामुळे उकाड्यापासून काहीसा दिलासा मिळाला तरी रस्त्यावर ठिकठिकाणी पाणी साचलेले होते. यातून मार्ग काढताना नागरिकांना चांगलीच कसरत करावी लागली. यावरून म हापालिकेकडून पावसानंतर रस्त्यांवर पाणी साचू नये यासाठी आवश्यक असलेल्या उपाययोजना फारशा गांभीर्याने करण्यात आलेल्या नाहीत हे पुन्हा समोर आले.

दुपारी झालेल्या काही तासांच्या पावसानंतर घाट रोडवरील सरदार पटेल चौक, अमरावती मार्गावरील भरतनगर, रविनगरचा भाग, शंकरनगर नरेंद्रनगर, मनीषनगर, पडोळे चौक, बजाजनगर चौकाचा काही भागासह अनेक प्रमुख रस्त्यांवर पाणी साचले. इतकेच नव्हे तर रामदासपेठसह अनेक प्रमुख वस्त्यांमधील आतल्या रस्तेही पाण्याने तुंबलेले होते.

जुलै अखेरीस झालेल्या पावसानंतर शहराचे अनेक भाग पाण्याखाली होते. यावेळी शहराच्या सीमावर्ती भागात राहणाऱ्या नागरिकांना बचाव करून सुखरुप बाहेर काढण्यात आले होते.

पावसानंतर महापालिकेच्या कामाची पोलखोल झाल्यानंतर शहराचे खासदार केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी महापालिकेला पुन्हा अशी परिस्थिती निर्माण होणार नाही यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याचे आदेश दिले होते. यात तुंबलेल्या पावसाळी वाहिन्यांची स्वच्छता करणे, पाणी साचणाऱ्या रस्त्यांवर ते निघून जाण्यासाठी आवश्यक उपाययोजना करणे आदी सूचना दिल्या होत्या. मात्र, यानंतरही याचे फारसे गांभीर्याने पालन झालेले नाही असे दिसून आले. अनेक पावसाळी वाहिन्यांमधील तुंबलेला कचरा, बांधकाम साहित्याचा पाण्याने जमा झालेला मलबा न काढल्याने पाणी निघून जायला मार्ग न मिळाल्याने रस्ते तुंबले. काही ठिकाणी पाणी निघून जाण्यासाठी नागरिकांकडून वाहिन्यांमधील कचरा काढून पाण्याला मार्ग मोकळा करून देण्यात येत होता.

## मोकाट कुत्र्यांची लासलगाव येथील नागरिकांमध्ये दहशत

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**



**दि.१२, विंचूर (नाशिक) :** लासलगाव येथील मध्यवर्ती ठिकाण असलेले बस स्थानक या ठिकाणी एका युवकास पाच ते सहा कुत्र्यांनी हल्ला केला तसेच गणेश नगर परिसरातही आरोही जाधव या चिमुकली वर चावा घेत.मोकाट कुत्र्यांनी लासलगाव तसेच टाकळी विंचूर या भागात शाळकरी मुलांमध्ये व पालकांम ध्ये मोठ्या प्रमाणात दहशत निर्माण झाली आहे. आजूबाजूच्या नगरपालिकांम धून रात्री गाड्यांमध्ये मोकाट कुत्रे सोडले जातात अशी लासलगाव येथील नागरिकांचे मत आहे. लासलगाव ग्रामपंचायत ने या वर लवकरात लवकर काही तोडगा काढावा अशी मागणी लासलगाव परिसरातून होत आहे लासलगाव सरपंच योगिता पाटील यांनी या गोष्टीची तातडीने दखल घेत

ग्रामीण रुग्णालय येथील वरिष्ठ अधिकाऱ्यांशी संपर्क करून डॉग बाईट ची लस सध्या उपलब्ध असून त्याला जोड देण्यात येणाऱ्या लसी चा साठा उपलब्ध नसल्यामुळे ग्रामपंचायत सरपंच योगिता पाटील व योगेश पाटील यांनी तातडीने लस मागवली आहे.

सदरील चिमुकली नागरिकांवर लासलगाव ग्रामीण रुग्णालयात येथे प्राथमिक उपचार देण्यात आले आहे.

## ठाण्यातील अनाधिकृत बांधकामांचा दंड माफ, शिंदेच्या नगरविकास विभागाचा निर्णय...

**अक्षराज : संजय पंडीत**



**दि.१२, ठाणे : ठाणे :** महापालिका निवडणुकीचे पडघम वाजू लागले असताना एकनाथ शिंदे यांच्या नगरविकास खात्याने एक मोठा निर्णय घेतला आहे. ठाणे शहरातील अनधिकृत बांधकामाचा दंड माफ करण्याचा निर्णय नगरविकास खात्याने घेतला आहे. ठाणे महापालिका क्षेत्रातील अवैध बांधकामावर करण्यात येणारा दंड हा साधारणतः २००९ पासून थकीत होता. सरकारच्या या निर्णयामुळे राज्य सरकारचे शेकडो कोटी रुपयांचे नुकसान होणार आहे.

महापालिका निवडणुकांच्या तोंडावर राज्य सरकारने अनधिकृत बांधकामाला संरक्षण दिल्याचा आरोप विरोधकांनी केला आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ठाणे शहरातील अनधिकृत बांधकामाचा महापालिकेकडून आकारण्यात येणारा दंड माफ करून राजकीय फायदा घेतला आहे. पण यामुळे सरकारी तिजोरीचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान होणार असल्याचा आरोप विरोधक करू लागले आहेत.

अवैध बांधकामांवर आकारण्यात येणारा हा दंड २००९ पासून थकित होता. या शिवाय आकारल्या जाणाऱ्या दंडाचे प्रमाण हे मूळ करापेक्षा जास्त होते. त्यामुळे मालमत्ताधारकांकडून दंड भरला जात नव्हता. त्याचा परिणाम ठाणे महापालिकेला कर रूपाने मिळणाऱ्या महसुलावर झाला होता.

शासनाच्या या नव्या निर्णयामुळे ठाणे महापालिका क्षेत्रात आकारण्यात येणारा ३१ मार्च २०२५ पर्यंतचा थकीत दंड माफ होणार आहे. मात्र, त्यासाठी सरकारने अटी आणि शर्ती घालून दिल्या आहेत. बेकायदा बांधकाम असलेल्या मालमत्ताधारकांनी मूळ कराची भरणा करणे आवश्यक राहील. त्यानंतरच थकीत दंड माफ होईल.

दरम्यान अवैध बांधकामावरील दंड माफ झाला म्हणजे सदरचे बांधकाम नियमित झाले असे समजण्यात येणार नाही. दंड माफ केला म्हणून त्यापोटी संबंधित महापालिकेस राज्य सरकारकडून कोणतेही अर्थसहाय्य अथवा नुकसान भरपाईची मागणी करता येणार नाही, असे शासन निर्णयात म्हटले आहे.

उच्च न्यायालयाच्या निर्देशानंतर राज्यातील रखडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकीचा मार्ग मोकळा झाला आहे. ऑक्टोबर महिन्यापर्यंत नवीन वॉर्ड रचना केली जाणार असून महापालिकेच्या निवडणुका या डिसेंबरच्या दरम्यान होण्याची शक्यता आहे. त्या पार्श्वभूमीवर सर्वच राजकीय पक्षांनी कंबर कसल्याचं दिसून येत आहे.

ठाणे हा एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचा बालेकिल्ला समजला जातो. त्यामुळेच या शहरातील अवैध बांधकामाच्या दंडाची माफी करून त्याचा राजकीय फायदा उचलला जात असल्याचा आरोप विरोधकांनी केला आहे.

## रक्षाबंधन निमित्त प्रवासी वाहतुकीतून एसटीला १३७ कोटी रुपयांचे उत्पन्न - परिवहन मंत्री

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१२, मुंबई :** यंदा रक्षाबंधन आणि त्याला जोडून आलेल्या सुट्ट्यांमुळे ८ ते ११ ऑगस्ट २०२५ या चार दिवसांमध्ये प्रवाशी वाहतुकीतून एसटीला १३७.३७ कोटी रुपयांचे उत्पन्न मिळाले आहे. विशेष म्हणजे ११ ऑगस्टला एका दिवशी तब्बल ३९ कोटी रुपयांचे उत्पन्न महामंडळाला प्रवासी वाहतुकीतून मिळाले आहे. यंदाच्या आर्थिक वर्षातील हे विक्रमी उत्पन्न आहे, अशी माहिती परिवहन मंत्री तथा महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली.

मंत्री श्री. सरनाईक म्हणाले, दरवर्षी एसटीला रक्षाबंधन आणि भाऊबीज (दिवाळी) या दोन दिवसात विक्रमी उत्पन्न मिळत असते. कारण, या दिवशी भाऊ बहिणीकडे किंवा बहिण भावाकडे असे प्रवासी दळणवळण मोठ्या प्रमाणामध्ये होते. परिणामी, गेली कित्येक वर्ष रक्षाबंधन सणाच्या कालावधी एसटीला त्या वर्षातील विक्रमी उत्पन्न मिळत आले आहे. यंदा रक्षाबंधन आणि त्याच्या दुसऱ्या दिवशी एसटीला प्रवाशांची प्रचंड गर्दी झाली होती. रक्षाबंधनच्या आदल्या दिवशी म्हणजे शुक्रवारी ३०.०६ कोटी रुपये, रक्षाबंधन दिवशी म्हणजे शनिवारी



३४.८६ कोटी व दुसऱ्या दिवशी म्हणजे रविवारी ३३.३६ कोटी रुपये तर सोमवारी तब्बल ३९.९ कोटी इतके विक्रमी उत्पन्न एसटीला मिळाले आहे. रक्षाबंधन सणाच्या निमित्ताने ८ ते ११ ऑगस्ट या ४ दिवसात १ कोटी ९३ लाख प्रवाशांनी एसटीमधून सुरक्षित प्रवास केला आहे. त्यामध्ये महिला प्रवाशांची संख्या तब्बल ८८ लाख आहे. रक्षाबंधन सणानिमित्त एवढ्या मोठ्या प्रमाणात प्रवाशांनी दिलेल्या प्रतिसादाबद्दल एसटी महामंडळाचे अध्यक्ष व परिवहन मंत्री श्री. प्रताप सरनाईक यांनी आभार मानले आहेत. तसेच आपल्या घरी सण असून देखील कर्तव्याला प्राधान्य देत अत्यंत मेहनतीने काम करुन विक्रमी उत्पन्न आणणाऱ्या एसटी कर्मचाऱ्यांचे मंत्री श्री. सरनाईक यांनी अभिनंदन केले आहे.

## बच्चू कडू यांना २०१८ च्या प्रकरणात ३ महिने तुरूंगवास !

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१२, मुंबई :** माजी मंत्री बच्चू कडू उर्फ ओमप्रकाश कडू यांना २०१८ च्या प्रकरणात ३ महिने तुरूंगवास आणि १० हजार रुपयांच्या दंडाची शिक्षा सुनवण्यात आली आहे. मुंबईतील सत्र न्यायालयाने सरकारी कर्मचाऱ्याचा कामात अडथळा आणला आणि धमकी दिल्याबाबत त्यांना दोषी ठरवले आहे. २०१८ मधील हे प्रकरण असून,आयएएस अधिकारी प्रदीप यांच्यात आणि बच्चू कडू यांच्या राडा झाला होता. मरीन लाइन्स पोलिस ठाण्यात तक्रार करण्यात आली होती. मुंबईतील सत्र न्यायालयाने या प्रकरणी दोषी ठरवले आहे.



अतिरिक्त सत्र न्यायाधीश सत्यनारायण नवंदर यांनी बच्चू कडू यांना १० हजार रुपयांचा दंड ठोठावला आहे. उच्च न्यायालयात अपील दाखल करेपर्यंत त्यांची शिक्षा निलंबित ठेवण्यात आली आहे आणि त्यांना जामीन मंजूर करण्यात आला आहे. कडू यांना कलम ३५३ (एखाद्या सरकारी कर्मचाऱ्याला त्याच्या कर्तव्यापासून रोखण्यासाठी त्याच्यावर हल्ला करणे किंवा गुन्हेगारी स्वरूपाची शक्ती वापरणे) आणि ५०६ (गुन्हेगारी धमकी) अंतर्गत दोषी ठरवण्यात आले आहे. मात्र, न्यायालयाने त्यांना हेतुपुरस्सर अपमान करण्याच्या आरोपातून मुक्त केले.

न्यायालयानेम्हटले आहे की, 'शासन किंवा एखाद्या विभागाच्या व्यवस्थापनाबद्दल किंवा सरकारच्या भरती प्रक्रियेदरम्यान परीक्षा घेण्याबाबत तक्रारी असू शकतात. पण याचा अर्थ असा नाही की लोकांचा कोणताही प्रतिनिधी अशा अधिकाऱ्याकडे जाईल आणि त्याच्यावर हिंसक हल्ला करेल, त्याला धमकावेल आणि त्याचे काम थांबवेल. न्यायाधीश म्हणाले, 'फक्त आरोपी आमदार आहे, म्हणून त्याला कोणत्याही सरकारी कर्मचाऱ्याला धमकावण्याचा किंवा त्याच्या कार्यालयात हल्ला करण्याचा परवाना नाही.' ही घटना २६ सप्टेंबर २०१८ रोजी घडली, जेव्हा तत्कालिन आमदार आणिप्रहार जनशक्ती पार्टीचेसंस्थापक कडू यांनी मुंबईतील माहिती आणि तंत्रज्ञान विभागाचे तत्कालीन संचालक आयएएस अधिकारी प्रदीप पी यांच्या कार्यालयाला भेट दिली होती.

एस.पी.एस.सी परीक्षा घेणारे महापोर्टलमधील त्रुटीसंबंधी जाब विचारण्यास गेले होते. बच्चू कडू आणि तत्कालिन महाराष्ट्र राज्य संचालक असलेले पी प्रदीप यांच्यात वाद झाला. त्यानंतर कडूंनी आयपॅड प्रदीप यांच्यावर उगारला होता. त्यासंबंधी पी प्रदीप यांनी तक्रार दाखल केली होती.

## संभाजीनगरच्या आलिशान हॉटेलमध्ये बलात्कार ! आरोपीची पीडितेला धमकी...

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१२, छ. संभाजीनगर :** बीड जिल्ह्यातील गेवराई पंचायत समिती माजी सभापतीचा पती व सत्ताधारी पक्षाच्या तालुकाध्यक्षाच्या मुलाने पंचायत समितीमध्ये काम करणाऱ्या महिला कर्मचाऱ्याला नोकरीवरून काढण्याची धमकी देत इगतपुरी नाशिकसह छत्रपती संभाजीनगरच्या आलिशान हॉटेलमध्ये बलात्कार केला आहे. एवढेच नाही तर व्हिडिओ छायाचित्राचा आधार घेत महिलेला ब्लॅकमेल देखील केला आहे. याप्रकरणी वेदांत नगर पोलीस ठाण्यामध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दीपक प्रकाश सुरवसे राहणार खांडवी गेवराई जिल्हा बीड असे आरोपीचे नाव आहे. पीडितेने दिलेल्या फिर्यादीनुसार, ३५ वर्षीय सोनाली (नाव काल्पनिक आहे) या २०१९ मध्ये शासकीय सेवेत रुजू झाल्या. याच दरम्यान गेवराई पंचायत समितीमध्ये आरोपी दीपकची पत्नी सभापती पदी नियुक्त झाली. पत्नी ऐवजी आरोपी दीपकपंचायत समितीचे सर्व कामे बघत होता. पंचायत समिती मधील अधिकाऱ्यांच्या बैठका घेणे त्यांना सूचना करणे हे काम तो करत होता. याच दरम्यान पीडित सोनाली आणि आरोपी दीपक याची ओळख झाली. महिला काम करत असलेल्या विभागाचं काम असल्याचं कारण सांगून दीपकने पीडित महिलेला शहरातील वेदांत नगर भागामध्ये असलेल्या आलिशान हॉटेलमध्ये घेऊन गेला. खोलीत जबरदस्ती केली महिलेने विरोध केला, तेव्हा तुला नोकरी गमवावी लागेल अशी धमकी देत अत्याचार केला. अत्याचार करताना फोटो आणि व्हिडिओ रेकॉर्ड केले.पतीपासून घटस्फोट घ्यायला पाडले भागदरम्यान, मे २०२५ मध्ये महिलेला आरोपी दीपकने पतीपासून घटस्फोट घेण्यास भाग पाडले. दीपकच्या छळा ला कंटाळून महिलेने काही महिन्यांपूर्वी शहरात स्थायिक होण्याचा निर्णय घेतला. आरोपी दीपकने शहरात येऊन महिलेच्या घराजवळ गोंधळ घातला. मुलांना व्हिडिओ दाखवण्याची धमकी देत धक्काबुक्की केली. या सर्व प्रकाराला कंटाळलेल्या महिलेने हा संपूर्ण प्रकार आरोपीच्या वडिलांना सांगितला. वडिलांनी महिलेलाच शिवीगाळ करून नोकरी येऊन काढण्याची धमकी दिली. याप्रकरणी वेदांत नगर पोलीस ठाण्यामध्ये आरोपीविरुद्ध बलात्काराचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

इगतपुरी, नाशिकसह पडेगावमध्ये पुन्हा अत्याचारया फोटो व्हिडिओचा आधार घेऊन दीपकने महिलेला ब्लॅकमेल करायला सुरुवात केली. हे व्हिडिओ तुझ्या कुटुंबाला पाठवीन अशी धमकी देत महिलेला इगतपुरी, नाशिक नंतर छत्रपती संभाजी नगर शहरातील पडेगाव भागात देखील अत्याचार केला.

# संपादकीय



## हत्ती वाचवा पर्यावरण वाचवा

१२ ऑगस्ट हा दिवस जगभर जागतिक हत्ती दिवस म्हणून साजरा केला जातो. जगभरात हत्तींची संख्या झपाट्याने कमी होऊ लागली आहे. त्वचा आणि हस्तिदंती वस्तुंसाठी तस्करांकडून हत्तींची मोठ्या प्रमाणात शिकार केली जाते. एका अंदाजानुसार दररोज अवैध शिकारीमध्ये किमान १०० हत्ती मारले जातात म्हणून वर्ल्ड एलीफंट फाऊंडेशनने २०११ सालापासून १२ ऑगस्ट हा दिवस जागतिक हत्ती दिवस अर्थात वर्ल्ड एलीफंट डे म्हणून साजरा करण्यास सुरुवात केली.

या दिवसाचे औचित्य साधून हत्तीचे पर्यावरणीय तसेच जीवशास्त्रीय महत्व याविषयी जनजागृती करण्यात येते. जगभरात आफ्रिका आणि आशियायी देशात हत्तींची संख्या सर्वाधिक आहे. जगातील ९० टक्के हत्ती या दोन खंडातच आढळतात पण आता या दोन खंडातही हत्तींचे प्रमाण घटू लागले आहे. अवैध शिकारींवर जर वेळीच अंकुश लावला नाही तर पृथ्वीवरून हत्ती नामशेष होऊ शकतात आणि जर पृथ्वीवरून हत्ती नामशेष झाले तर त्याचा मोठा परिणाम पर्यावरणावर होऊ शकतो. पृथ्वीवरून हत्ती नामशेष झाले तर पृथ्वीच्या वातावरणातील कार्बन डायऑक्साइड या वायूचे प्रमाण वाढण्याची शक्यता वर्तवली आहे.

हत्ती कमी झाल्यास निर्माण होणाऱ्या धोक्यासंदर्भात सेंट लुईस विद्यापीठातील संशोधकांनी केलेले संशोधन नेचर जिओ सायन्स या नियतकालिकेत छापून आले होते. हे संशोधन प्रसिद्ध झाल्यानंतर जगभरातील पर्यावरण व वन्यजीवप्रेमींनी हत्ती वाचवा मोहीम हाती घेतली. जगभरात ही मोहीम आता जोर धरू लागली आहे. पृथ्वीवरील सर्वात महाकाय व सर्वात बलवान शाकाहारी प्राणी म्हणून हत्तीची गणना होते. हत्तीच्या प्रचंड वजनदार आकारमानामुळे जंगलात एकप्रकारे ते बुलडोझरचे काम करतात. त्यांच्या या चालण्यामुळे ते जंगलात नव्या वाटा निर्माण करतात. गवत व विविध वृक्ष वेलिंच्या परागीभवनात हत्तींच्या हालचालींचा मोठा वाटा असतो. ते गवत तुडवतात. विविध जातींच्या झाडांची फळे आणि पाने खातात. काही वेळा ते जंगलातील वठलेली झाडे धक्का देऊन पाडतात. या सगळ्यांच्या त्या जंगलाच्या वनक्षेत्राच्या इकोसिस्टीमवर परिणाम होत असतो.

हत्ती जंगलात असल्यामुळे झाडांची संख्या नियंत्रणात राहते. जंगलात वेगाने वाढणाऱ्या वनस्पती हवेतील कार्बन डायऑक्साइडचे प्रमाण वाढण्यास कारणीभूत असतात. विशेषतः आफ्रिकेतील हत्तींबाबत करण्यात आलेल्या संशोधनात असे आढळून आले आहे की हत्ती अशा वेगाने वाढत असलेल्या वनस्पतींची पाने खात असल्याने वातावरणात सोडण्यात येणारा कार्बन डायऑक्साइड कमी प्रमाणात सोडला जातो. मध्य आफ्रिकेतील कांगो प्रजासत्ताकाच्या अख्यातीरित येत असलेल्या जंगलात याबाबत संशोधन केले असता वरील निष्कर्ष संशोधकांनी काढले आहे. त्यामुळे हत्तींची संख्या वाढत राहिली तरच वातावरणातील प्राणवायू टिकून राहील आणि कार्बनचे प्रमाण कमी होईल हे जाणूनच पर्यावरण आणि वन्यजीव प्रेमींनी हत्ती वाचवा मोहीम सुरू केली आहे.

हत्ती वाचवणे ही काळाची गरज आहे. या मोहिमेत सर्व देशांनी सहभाग नोंदवायला हवा. पर्यावरण वाचवायचे असेल आणि वातावरणातील कार्बनचे प्रमाण कमी करायचे असेल तर हत्तींची अवैध शिकार रोखली पाहिजे. हत्तींची शिकार करणाऱ्यांवर कठोर कारवाई केली पाहिजे. हत्ती वाचेल तरच वातावरण वाचेल, पर्यावरण वाचेल. हत्ती वाचवा पर्यावरण वाचवा.

# शिस्तीतून माणूस घडतो

सकाळी दहा वाजता शाळेत प्रार्थनेची घंटा झाली.शाळेच्या प्रांगणात खेळणारे,फिरणारे आम्ही घंटेचा आवाज ऐकून प्रार्थनेच्या ठिकाणी वर्गानुसार शिस्तीत उभे राहिलो.उंचीनुसार व वर्गानुसार रांगा बनवल्या.कारण गुरुजी हातात छडी अन शिट्टी घेऊन उभे होते मग गुरुजींनी सांगितल्यानुसार आपापल्या ठिकाणी उंचीनुसार उभे राहिलो. कालांतराने याचं ज्ञान सर्वांना हळू हळू येऊ लागलं. पोरां-पोरींना त्यांची उंची समजायला लागली.त्या हिशोबाने सर्वजण उभे सावधान-विश्राम या ऑर्डर प्रमाणे हातपायाची हालचाल करून शिस्तीत उभे राहिलो राष्ट्रगीत,प्रार्थना आणि निती मूल्याचा पाठ झाला,सर्वजण रांगेत वर्गाकडे निघाले.वर्गात दोन बाय दोनच्या दगडी फरशीवर जाड्या-भरड्या कापडाच्या लांबट पट्ट्यावर बसलो. वर्गात बसणंही साधारण उंचीनुसारच ठरलेलं होतं,कारण फळ्यावरचं मागच्याला दिसायला हवं.पण हा नियम वर्गात फारसा वर्गात लागू पडत नव्हता कारण,हुशार पोरं पुढे बसायचे.गुरुजीच्या धाकामुळे खोडकर,खट्याळ पाठीमागे बसायचचे.तसा मी तेवढाही हुशार नाही अन एकदम ढही नाही. म्हणून साधारण तिसऱ्या-चौथ्या नंबर वर बसलो.मुलींचीही बैठक व्यवस्था त्याचप्रमाणे असायची.

वर्गात बसल्यावर आपापले दप्तर साधारण बैठीकीच्या डाव्या किंवा उजव्या बाजू ठेवायचो. कितीही शिस्तीत बसले तरी,वर्ग पहिला म्हणजे नुसती चावचाव आणि पक्षासारखी किलबिलाट असायचीच.कारण शाळेत दाखल होण्याअगोदर रांगड्या खेळाच्या वातावरणातून,निश्चित नियमाच्या चौकटीच्या खोलीत बसणं म्हणजे अवघड....! पण माय बाबांनं शाळेत धाडलं अन शिकून मोठं व्हायचं म्हणजे सहन करावं लागणारच.विद्यार्थी संख्या भरपूर असल्यामुळे गुरुजींनी वर्ग पाहिलीचे अ,ब,क अश्या तीन तुकड्या केल्या.गल्लीत सोबत-सोबत खेळणारे मित्र दुसऱ्या तुकडीत गेल्यामुळे थोडं कंटाळवाणं वाटायचं.पण काय करणार? गुरुजींनी बनवलेल्या वर्गांच्या तुकडीनुसार बसावच लागायचं.पाणी पिण्याची,माध्यान्ह भोजनाची अन मूत्र-विसर्जनाची सुट्टी झाली की,थोड्या वेळ का होईना पण आम्ही एकमेकांना भेटायचो.अन घंटा झाली कि अपा पल्या वर्गात येऊन बसायचो.

प्रार्थनेनंतर रांगेत वर्गात गेलो.बसल्यावर शांत बसणं कसं शक्य?याला चिमटा घे.त्याला बुक्का मार. त्याला धक्का दे.ही मही जागा ही तुही जागा असे जागेवरून भांडण.तेवढ्यात हजेरी,डस्टर अन खडू घेऊन गुरुजी वर्गात आले.गुरुजी वर्गात आल्यावर उभं राहावं लागतं.हे आम्हाला कसे ठाउक? म्हणून आम्ही सर्वजण बसलेलोच राहिलो.गुरुजी वर्गात आल्यावर उभं रहावे.हे माहित नव्हतं.पुढे गुरुजींनीच शिकवलं.गुरुजीं वर्गात आले.सर्वजण अगदी शांत बसले.बेशिस्त बसलेले आम्हां पोरां कडे गुरुजीचे लक्ष गेले.गुरुजींनी रांगेत सरळ बसा.हे वर्गातील रांगेत सरळ बसणं.प्रार्थणेसाठी रांगेत उभे राहणं. हेच जीवनातील सर्वात पहिली शिस्तीचे धडे बनले. आम्हाला शिस्तीत बसवून गुरुजी खुर्चीवर बसले. हजेरिचं पान उकललं.एक नंबर पासून सर्वांचं नाव वाचू लागले. नाव वाचलं की,ताडकन उभे राहायचं आणि सॅल्यूट केल्यासारखं उजवा हात कपाळापर्यंत न्यायचा. मोठ्या आवाजात हजर सर म्हणायचे. म्हणजे या दिवशी शाळेत हजर आहे. याचा जणू हा पुरावाच..! असं आम्हा सर्व मुलींचे व मुलांचे नाव वाचून सगळ्यांनी हजर सर- हजर सर म्हणून आपा पली हजेरी दर्शवली.शाळेत नाव आणि जि प च्या सरकारी शाळेतील हजेरीत नाव पडल्याचं शिक्कामोर्तब झालं.

गुरुजींनी जो वर्गात हजर आहे त्याच्या समोरील तारखेच्या रकान्यात इंग्रजीमध्ये पी म्हणजे प्रेझेंट लिहिलं आणि जो गैरहजर असेल त्याच्या समोर इंग्रजीतीलएलिहिलं म्हणजे अबसेन्ट याचा अर्थ गैरहजर असं लिहलं.गुरुजी खुर्चीवरून उठले.फळ्यावरील अगोदरचं लिखाण डस्टरनी पूर्ण मिटवलं. डाव्या बाजूला वर्ग पहिला.त्याखाली तुकडी क असं लिहिलं.तर उजव्या बाजूला पटावर, त्याखाली हजर व त्याच्याखाली गैरहजर असं लिहिलं.पटावर म्हणजे हजेरीप्रमाणे वर्गात एकूण किती विद्यार्थी तो आकडा.फारसा आठवत नाही परंतु साधारण ४० विद्यार्थ्यांची तुकडी होती.त्यापैकी पटावर ३७ ते ३८ हे हजर असायचे. व एक किंवा दोन असायचे.असे हजेरीवरून गुरुजींनी आकडे भरले.हाच काळा फळा आणि पांढरा खडू आमचे जीवन बदलायला, शिक्षित करायला सहाय्यभूत ठरला.त्याच्या जोडीला आमची काळी पाटी आणि पांढरी लेखन ही आमच्या जीवनाचं सार्थक करायला तथा अज्ञानपणाच्या अंधाराकडून प्रकाशाकडे नेणारी प्रकाशवाट ठरली.

शाळेत दाखल झाल्यावर पहिल्या दिवशी गुरुजींनी जीवनात शिस्तीचे धडे दिले.ते आयुष्यभर जीवनाचं सोनं करायला उपयोगी ठरलं. पहिल्या दिवशी पुस्तकातील ज्ञानाऐवजी जीवनातील शिस्त व नीतिमल्याचे ज्ञान दिले. वडीलधाऱ्यांचा आदर,सन्मान कसा करावा हे सांगितले. हसत खेळत शिक्षण पद्धती तून आम्हाला समजावं म्हणून गुरुजींनी प्रात्याक्षिक करून दाखवलं.त्यासाठी गुरुजी वर्गाबाहेर गेले. परत वर्गात आले.गुरुजींनी वर्गात प्रवेश केल्यावर,सगळ्यांनी उभे राहायचे.त्यानंतर प्रहारानुसार सगळ्यांनी एक सुरात अर्थात सकाळी शुभ सकाळ,शुभ दुपार व शेवटची सुट्टी म्हणजे साधारणतः चारच्या नंतर शुभ संध्याकाळ किंवा शुभ दुपारही म्हटले तरी हरकत नाही.असं दोन चार वेळेस करून दाखवलं. गुरुजींनी सांगितल्याप्रमाणे सर्वजण उभे राहिले.एका सुरातील शुभ सकाळ सर,शुभ दुपार सर,असं हे शिस्तीच,आदराचं नीतिमूल्याचं ज्ञान व तो आम्हां चिमुकल्यांचा एक सुरातील आवाज अजूनही कानात गुणगुणत राहतो. आताही शाळेच्या रस्त्यावरून जातांना कितीतरी वर्षाअगोदरचा आठवणीतील आवाज एकूण क्षणभर थांबावंसं वाटतं व परत ऐकावासा वाटतो.

असे हे गुरुजींनी हजेरीतील वाचलेलं नाव व म्हटलेलंहजर सर हो सर,यस सर हे आयुष्यात खूप काही शिकून जातं.समाजात वावरताना,आपल्यापेक्षा मोठ्या व्यक्तींचा मान कसा राखायचा.मोठे बहीण -भाऊ,गावातील गल्लीतील काका,मामा यांचा आदर कसा ठेवावा याचे ज्ञान मिळते.एखाद्या कार्यालयात गेल्यानंतर तिथे कसं वागायचं.स्वतः नोकरीला लागल्यावर आपले वरिष्ठ अधिकारी तथा सहकारी मित्र यांच्यासोबत कसं वागावं.अश्या या अगदी छोट्या-छोट्या गोष्टीतून गुरुजीकडून बहुमूल्य असं हे शिस्तीचं व संस्कारशील ज्ञान व मार्गदर्शन पुस्तकातील ज्ञानाबरोबर मिळते व त्यातूनमाणूस म्हणून घडायला मदत होते व जीवनविकास होतो.

समस्त गुरुजनांना प्रणाम...!

**श्री.विनोद शेनफड जाधव**
**मासरूळ जि.बुलडाणा**
**मो.नं.९७६३२८२०७७**

# दिघा परिसरातील उग्र वासाच्या तक्रारीच्या अनुषंगाने मध्यरात्रीच्या गस्तीत केमिकल टँकर जप्त

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१२, नवी मुंबई :** नवी मुंबई महानगरपालिकेच्या दिघा विभागामध्ये ०७ ऑगस्टपासून ग्रीन वर्ल्ड सोसायटी आणि रामनगर परिसरात केमिकलचा उग्र वास येत असल्याने परिसरातील नागरिकांना त्रास होत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. त्या भागात अथवा नाल्यामध्ये अज्ञात व्यक्ती उग्र रसायन सोडत असल्याचा संशय असल्याने पोलीस यंत्रणा, ऐरोली अग्निशमन दल, प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि पर्यावरण विभागाला कळविण्यात आले होते. त्यानुसार सदर रसायन कोठे सोडण्यात येत आहे हे शोधण्याचा प्रयत्न करण्यात येत होता. यावेळी नवी मुंबई महानगरपालिकेच्या पर्यावरण विभागामार्फत ग्रीन वर्ल्ड सोसायटी समोरील नाल्यातील पाण्याचे सॅम्पल तपासणीसाठी नेण्यात आले होते.

त्यानंतरही दिघा विभागातील अधिकारी/कर्मचारी तसेच पर्यावरण विभागातील अधिकारी/कर्मचारी रात्रीच्या वेळी गस्त घालत होते. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी श्री अडकर आणि श्री.देशमुख तसेच नवी मुंबई महानगरपालिका पर्यावरण विभागातील कनिष्ठ अभियंता श्री.अजिंक्य पाटील व दिघा विभाग कार्यालयामार्फत पहाटेपर्यंत संयुक्त तपासणी दौरा करण्यात आला.

या दौ-यामध्ये ग्रीन वर्ल्ड सोसायटीमधील पदाधिकारी व नागरिक यांच्याकडेही चौकशी करण्यात आली. चौकशीमध्ये ऐरोली मधील नेवा गार्डन सोसायटीच्या जवळ असलेल्या नाल्यामध्ये रात्री टँकरद्वारे केमिकल सोडण्यात येत असल्याची माहिती प्राप्त झाली. त्यानुसार त्या ठिकाणी कर्मचाऱ्यांमार्फत पाळत ठेवण्यात आली, तसेच रात्रीच्या वेळी गस्तही सुरु होती.

या गस्तीमध्ये ११ ऑगस्ट रोजी रात्री साधारणत: १.०० वाजता. दिघा स्टेशन समोर मुकंद कंपनी गेटजवळ उभ्या असलेल्या संशयित टँकरच्या तपासणीमध्ये त्या टँकरमध्ये उग्र दुर्गंधीचे रसायन असल्याचे आढळून आले. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी श्री. सचिन आडकर, श्री. सचिन देसाई आणि श्री. देशमुख यांनी लिटमस पेपरद्वारे ते रसायन तपासले असता सदर रसायन हानीकारक असल्याचे आढळून आले. याबाबत पोलीस हेल्पलाइन ११२ क्रमांकावर तक्रार नोंद करण्यात आली. त्यानुसार पोलीस बीट मार्शल आणि विभागाचे पोलीस निरीक्षक हे घटनास्थळी दाखल झाले. त्यानंतर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी आणि नवी मुंबई महानगरपालिकेचे दिघा विभाग अधिकारी तथा सहा.आयुक्त नैनेश बदले व पर्यावरण विभागातील कनिष्ठ अभियंता अजिंक्य पाटील या सर्वांनी घटनास्थळाचा पंचनामा केला. त्यावर ग्रीन वर्ल्ड सोसायटीचे सेक्रेटरी व रहिवासी यांची साक्ष घेण्यात आली. घटनास्थळी उभ्या असलेल्या टँकर मधील रसायनाचे नमुने तपासणीसाठी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ आणि नमुंमपा पर्यावरण विभाग यांच्या प्रयोगशाळेत पाठविण्यात आले आहेत. याबाबत गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास सुरु आहे.

## दावा..

शत्रुवर केला हल्ला
पुरावा भक्कम ठेवा
नंतर नसेल फिकीर
विश्वास ठेवा न ठेवा

करे व्हिडिओ शूटिंग
सबळ करायले दावा
युध्द परिपूर्ण होताचं
मिडीयाचेहाती द्यावा

शत्रूचेनुकसान किती
आढावा सत्वरघ्यावा
आपली हानी केवढी
तपशीलतपास द्यावा

अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी

मुळी नको चूक भूल
ऑडिटर सोबत हवा
चाले आरोपप्रत्यारोप
रे प्रदुषित होईल हवा

सॅटेलाईट कॅमेरानभी
सु योग्य जागी बसवा
आपला बातमीदारही
दुश्मन सैन्यांत घुसवा

आरोप तोफा धडधडे
ताफ परिक्षणा न्यावा
याच देही याची जागी
अनुभव प्रत्यक्षां यावा

**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**मो. ९७३०३०६९९६**

# मांसाहारी हॉटेल्स, केएसी सारखी उपहारगृह बंद ठेवणार का?

## माजी आमदार राजू पाटील यांचा के.डी.एम.सी.ला सवाल

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.१२, डोंबिवली (ठाणे) :** कल्याण डोंबिवली महापालिकेने १५ ऑगस्ट निमित्त कल्याण डोंबिवली महापालिका क्षेत्रात चिकन मटण विक्रीसाठी बंदी घातली आहे. याबाबतच्या नोटीसा महापालिका क्षेत्रातील चिकन व मटन विक्रेत्यांना देण्यात आल्या आहेत. आदेशाचे उल्लंघन केल्यास कारवाई करण्याचा इशारा देखील कल्याण डोंबिवली महापालिकेने चिकन मटण विक्रेत्यांना दिला आहे.या निर्णयाविरोधात हिंदू खाटिक समाजाने आक्रमक पवित्र घेतला असून आता आता मनसेने सुद्धा निर्णयावर आपली भूमिका मांडली आहे. मनसे नेते राजू पाटील यांनी एक्स पोस्ट करत १५ ऑगस्ट २०२५ रोजी मांसाहारी हॉटेल्स, केएफसी, मॅकडोनाल्ड्स सारखे उपाहारगृह बंद ठेवणार आहात का ? असा सवाल उपस्थित केला आहे..



राजू पाटील आपल्या एक्स पोस्ट मध्ये म्हणाले की, १५ ऑगस्ट देशाचा स्वातंत्र्य दिवस व त्याच दिवशी श्रीकृष्ण जयंती पण आहे, त्यात श्रावण ! अर्थातच बहुसंख्य लोक त्यादिवशी शाकाहार करणे पसंत करतील. परंतु काहीतरी निमित्त काढून जर कल्याण-डोंबिवलीचे आयुक्त त्या दिवशी मटण व मच्छी विक्री वर बंदी आणण्याचा फतवा काढत असतील तर त्याला विरोध तर होणारच.त्याचपुढे ते असे म्हणाले की, १५ ऑगस्टला मांसाहारी हॉटेल्स, केएससी, मॅकडोनाल्ड्स सारखे उपाहारगृह बंद ठेवणार आहात का ? कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्राला लागूनच असलेला ठाणे, उल्हासनगर, नवी मुंबई महानगरपालिका व जिल्हा परिषद क्षेत्रात असा कुठलाच फतवा काढला नसताना आमच्या आयुक्तांना ही उपरती का झाली हे अनाकलनीय आहे. आमचा या फतव्याला विरोध आहे, असे त्यांनी म्हटले.

तसेच ज्यांना जे खायचे ते खावे, कोणी काय खावे याचे प्रत्येकाला स्वातंत्र्य आहे. आयुक्तांनी हा फतवा मागे घ्यावा, उगीचच चांगल्या दिवशी आमच्या व प्रशासनाच्या डोक्याला ताप देऊ नये. माझी ठाणे पोलिस आयुक्तांना पण विनंती आहे की चांगल्या दिवशी होऊ घातलेला संघर्ष टाळावा, असे पाटील यांचे म्हणणे आहे.

# कोकण विभागीय स्तरावरील ध्वजारोहण कोकण भवन येथे होणार

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.१२, नवी मुंबई :** स्वातंत्र्यदिनाच्या वर्धापन दिनोत्सवानिमित्त कोकण विभागीय स्तरावरील ध्वजारोहण सीबीडी बेलापूर, नवी मुंबई येथील कोंकण भवन इमारतीच्या प्रांगणात शुक्रवार दि.१५ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी ठीक ०९.०५ वाजता कोकण विभागीय महसूल आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी



(भा.प्र.से) यांच्या हस्ते होणार आहे. या राष्ट्रध्वज वंदन व संचलन समारंभास शासकीय अधिकारी, कर्मचारी आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने राष्ट्रीय अथवा समारंभीय पोषाखात उपस्थित रहावे, समारंभ सुरु होण्याच्या २० मिनिटे अगोदर कार्यक्रमस्थळी उपस्थित रहावे. तसेच सुरक्षिततेच्या दृष्टीने कृपया कोणतीही बॅग सोबत आणू नये, असे आवाहन कोकण विभागीय महसूल आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी केले आहे.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## दक्षिण सोलापूर शालेय तालुकास्तरीय तायक्कांडो स्पर्धेचे उद्घाटन



**अक्षराज : शिवराज मुगळे**

**दि.१२, सोलापूर :** शारीरिक तंदुरुस्ती राखताना विद्यार्थ्यांनी खेळाच्या माध्यमातून निरोगी जीवन जगावे, असे आवाहन मंद्रुपचे सहायक पोलिस निरीक्षक मनोज पवार यांनी केले. मंद्रुप येथे शालेय तालुकास्तरीय तायक्कांदो क्रीडा स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. जिल्हा क्रीडा कार्यालय यांच्यावतीने मंद्रुप येथील लोकसेवा विद्यामंदिर व कनिष्ठ महाविद्यालयात या स्पर्धेचे आयोजन केले होते. या स्पर्धेत १४, १७ व १९ वर्षे वयोगट मुले व मुली यांच्या तायक्कांदो स्पर्धा झाल्या. या उद्घाटन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानीमंद्रूपचे केंद्रप्रमुख कल्लाप्पा हेळवी होते. यावेळी महात्मा फुले महाविद्यालयाचे क्रीडा शिक्षक सुनील टेळे, पर्यवेक्षक मधगोंडा मलकारी , ज्येष्ठ क्रीडा शिक्षक शीधर टेळे, विश्वनाथ घाटे, अरविंद राठोड, शिवपुत्र म्हेत्रे व विष्णुपंत देशपांडे इंग्लिश मिडियम क्रीडा शिक्षक अमृत पवार, दक्षिण सोलापूर तायक्कांदो अकॅडमीचे मुख्य प्रशिक्षक शिवराज मुगळे उपस्थित होते. यावेळी मंद्रुप पोलिस स्टेशनचे सहायक पोलिस निरीक्षक मनोज पवार यांच्या हस्ते सरस्वतीच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर राष्ट्रीय खेळाडूंचा सत्कार करण्यात आला. यावेळी राष्ट्रीय पंच नेताजी पवार, जोहील जाधव, विश्वजीत मरबे, यश खंदारे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी तालुक्यातील सर्व क्रीडाशिक्षक, पालक व खेळाडू उपस्थित होते. सूत्रसंचालन सुभाष सुतार यांनी केले तर नागनाथ धनाळे यांनी मानले केले.


## आंतरराष्ट्रीय तायक्कांदो प्रशिक्षक कोचिंग लायसन अक्षय खेतमर उत्तीर्ण



**अक्षराज : शिवराज मंगळे**

**दि.१२, सोलापूर :** तायक्कान्दो क्षेत्रात मोलाची भर घालत अक्षय खेतमर यांनी वर्ल्ड तायक्कान्दो च्यावतीने घेण्यात आलेल्या इंटरनॅशनल क्योरूगी तायक्कान्दो कोचिंग लायसन लेवल वन या परीक्षेत उत्तीर्ण होत उज्वल यश संपादन केले आहे. या आंतरराष्ट्रीय परीक्षेत जगभरातील ५४ स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. अक्षय खेतमर हे अनेक आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय पदकप्राप्त खेळाडू घडविणारे कुशल प्रशिक्षक असून स्वतः ही तायक्कान्दोचे आंतरराष्ट्रीय पंच व खेळाडू आहेत. तायक्कान्दो क्षेत्रात त्यांनी मिळवलेल्या कामगिरीबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे. या विशेष यशाबद्दल तायक्कान्दो असोसिएशन ऑफ महाराष्ट्र चे अध्यक्ष संदीप ओंबासे, महासचिव गफार पठाण, कोषाध्यक्ष प्रसाद कुलकर्णी व सर्व पदाधिकारी, सातारा जिल्हा अम्याच्युअर तायक्कान्दो असोसिएशन चे अध्यक्ष सुनील कोडगुले, सचिव संतोष सस्ते, कोषध्यक्ष गफार पठाण, उपाध्यक्ष विजय खंडाईत तसेच कराड तालुका तायक्कान्दो असोसिएशन चे अध्यक्ष अमोल पालेकर यांनी अक्षय खेतमर यांचे अभिनंदन केले.

## फोर व्हीलर गाडीमध्ये गोमातेची तस्करी



**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.११, भिवंडी (ठाणे) :** ठाणे जिल्ह्यातील गोरक्षक रक्षक यांनी भिवंडी पडगा येथे गोमातेची (गाईंची) तस्करी करणारी फोर व्हीलर स्विफ्ट गाडी पकडली आहे. त्याच्यामध्ये एमडी सुद्धा सापडली आहे. गोरक्षक यांच्यामुळे दोन गोमाता (गाईचे) प्राण वाचले आहेत. स्विफ गाडी मधून गोमातेची (गाईंची) तस्करी केली जाते. आणि त्यानंतर त्यांची हत्या केली जाते. गोरक्षक यांच्यामुळे दोन गोमातेचे (गाईंचे) प्राण वाचले आहेत. घटना स्थळी पडघा पोलीस स्टेशनचे अधिकारी सुद्धा दाखल झाले होते. गोमातेला इंजेक्शन देऊन बेशुद्ध सुद्धा करण्यात येते. गाडीमध्ये इंजेक्शन सुद्धा सापडले आहेत. एमडी ची नशा करून गोमातेचे तस्करी करणारे गाडी चालवत असतात आणि गोरक्षकांच्या अंगावर चढवून त्यांना मारण्याचा प्रयत्न करतात.

## राजेंद्र विद्यालयात राष्ट्रीय ग्रंथपाल दिन साजरा



**अक्षराज : बाळू धायगुडे**

**दि.१२, खंडाळा (सातारा) :** भारतातील ग्रंथालय विज्ञानाचे जनक डॉ.एस.आर. रंगनाथन यांच्या वारशाचा गौरव करण्यासाठी दरवर्षी १२ ऑगस्ट रोजी राष्ट्रीय ग्रंथपाल दिन साजरा केला जातो. मंगळवार, दिनांक १२ ऑगस्ट २०२५ रोजी या दिनाचे औचित्य साधून राजेंद्र विद्यालय, खंडाळा येथे मान्यवरांच्या उपस्थितीत राष्ट्रीय ग्रंथपाल दिनी ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. खंडाळा विभाग शिक्षण समितीचे संचालक वसंतराव पंडित यांच्या हस्ते ग्रंथप्रदर्शनाचे उदघाटन करण्यात आले. यावेळी खंडाळा विभाग शिक्षण समितीचे सदस्य तथा माजी प्राचार्य शब्बीर नालबंद, राजेंद्र विद्यालय व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य तुळशीराम खांडे, प्राचार्य जयवंत जगताप, उपप्राचार्य अरुंधती गाढवे, उपमुख्याध्यापक सुशिला मोहिते, पर्यवेक्षक माने, ग्रंथपाल हणमंत यादव यांची प्रमुख उपस्थिती होती. या समारंभासाठी संस्थापक अध्यक्ष शंकरराव गाढवे सर,सचिव अनिरुद्ध गाढवे यांनी शुभेच्छा दिल्या. हा समारंभ यशस्वी होण्यासाठी शिक्षक सोमनाथ गर्जे, ज्ञानेश्वर ढमाळ विशेष परिश्रम घेतले.

# महाराष्ट्रात डेटा सेंटर आणि औद्योगिक पार्कसाठी मोठी गुंतवणूक

### मुख्यमंत्री व सिंगापूरचे उपपंतप्रधान गन किम योंगयांच्या प्रमुख उपस्थितीतकॅपिटालँड डेटा सेंटरचे उद्घाटन




**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१२, ठाणे :** मेडिसिटीहा एक महत्त्वाकांक्षी आरोग्य प्रकल्प असून या प्रकल्पाचा मुख्य उद्देश नागपूरला देशातील एक प्रमुख वैद्यकीय केंद्र बनविणे, तेथे आंतरराष्ट्रीय दर्जाच्या आरोग्य सुविधा उपलब्ध करून, केवळ विदर्भातीलच नव्हे, तर संपूर्ण महाराष्ट्रातील आणि शेजारील राज्यांतील रुग्णांना ही उत्तम उपचार मिळावेत, हा आहे. या मेडिसिटीमध्ये विविध सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल, रिसर्च सेंटर्स, वैद्यकीय शिक्षण संस्था आणि इतर आरोग्य सुविधांचा समावेश असणार आहे. या मेडिसिटीच्या निर्माणासाठी मणिपाल हेल्थ एंटरप्रायझेस प्रा. लि. आणि टेमासेक यांनी पुढाकार घ्यावा, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज नवी मुंबईतील ऐरोली येथे केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि सिंगापूरचे उपपंतप्रधान गन किम योंग यांच्या प्रमुख उपस्थितीत नवी मुंबई येथे कॅपिटालँड डेटा सेंटरचे उद्घाटन आज संपन्न झाले. त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी सिंगापूरचे परिवहन मंत्री जेफरी सिओ, कॅपिटालँड इंडिया ट्रस्टचे अध्यक्ष मनोहर खैतानी, कॅपिटालँड इंडियाचे मुख्य कार्यकारी अधिकारी संजीव दासगुप्ता, मुख्यमंत्र्यांचे मुख्य गुंतवणूक सल्लागार कौस्तुभ धवसे, उद्योग विभागाचे सचिव डॉ. पी. अनबलगन, कोकण विभागीय आयुक्त डॉ.विजय सूर्यवंशी, ठाण्याचे जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ, नागपूरचे जिल्हाधिकारी डॉ.विपीन इटनकर, नवी मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त डॉ.कैलास शिंदे आदी मान्यवर उपस्थित होते.मुख्यमंत्री फडणवीस पुढे म्हणाले की, महाराष्ट्र शासन आणि मणिपाल हेल्थ एंटरप्रायझेस प्रा. लि. आणि टेमासेक यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला आहे. या करारांतर्गत नागपूर येथे ३५० खाटांचे मल्टिस्पेशालिटी रुग्णालय उभारण्यात येणार असून, यासाठी रु.७०० कोटींपर्यंतची गुंतवणूक प्रस्तावित आहे. या प्रकल्पामुळे अंदाजे रोजगाराच्या ३ हजार संधी देखील उपलब्ध होणार आहेत.या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री महोदयांनी संबंधित कंपनीला आवाहन केले आहे की, त्यांनी नागपूरमध्ये मेडिसिटी उभारावी. नागपूरमधील मेडिसिटी हा एक महत्त्वाकांक्षी आरोग्य प्रकल्प असून या प्रकल्पाचा मुख्य उद्देश नागपूरला देशातील एक प्रमुख वैद्यकीय केंद्र बनविणे, नागपूरमध्ये आंतरराष्ट्रीय दर्जाच्या आरोग्य सुविधा उपलब्ध करून, केवळ विदर्भातीलच नव्हे, तर संपूर्ण महाराष्ट्रातील आणि शेजारील राज्यांतील रुग्णांनाही उत्तम उपचार मिळावेत, हा आहे.

या मेडिसिटीमध्ये विविध सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल, रिसर्च सेंटर्स, वैद्यकीय शिक्षण संस्था आणि इतर आरोग्य सुविधांचा समावेश असणार आहे.मुख्यमंत्री श्री.फडणवीस म्हणाले की,स्टेट ऑफ आर्टअशा प्रकारच्या कॅपिटालँडच्या डेटा सेंटरचे आज उद्घाटन संपन्न झाले आहे.टेक्नॉलॉजी व्हाईस ॲडवान्सअशा प्रकारचे हे डेटा सेंटर आहे. त्याच्यामध्ये वेगवेगळ्या प्रकारे अतिशय चांगल्या पद्धतीच्या व्यवस्था करण्यात आलेल्या आहेत. आपण ज्या डिजिटल अर्थव्यवस्थेमध्ये आहोत त्याच्यामध्ये प्रत्येक गोष्टीची कार्यक्षमता वाढविण्याकरिता आपल्याला डेटा सेंटरची आवश्यकता पडते आणि म्हणून देशामध्येही ही क्षमता उभी राहणे महत्त्वाचे आहे.ते म्हणाले की, देशाची ६० टक्के डेटा सेंटर क्षमता एकट्या महाराष्ट्रात उभी राहिली आहे.

आज महाराष्ट्र शासन आणि कॅपिटालँड इन्व्हेस्टमेंट लिमिटेड यांच्यामध्ये सामंजस्य करार करण्यात आला आहे. या करारांतर्गत सुमारे रु.१९ हजार २०० कोटींची प्रस्तावित गुंतवणूक होणार असून, कॅपिटालँड इन्व्हेस्टमेंट आणि महाराष्ट्रातील त्यांच्या सहयोगी कंपन्यांकडून या गुंतवणुकीला चालना मिळणार आहे. तसेच या करारामुळे अंदाजे रोजगाराच्या थेट ६० हजार संधी देखील उपलब्ध होणार आहेत. या करारांतर्गत मुंबई आणि पुणे येथे बिझनेस पार्क्स, मुंबई आणि पुणे येथे डाटा सेंटर्स, संपूर्ण महाराष्ट्रात लॉजिस्टिक्स आणि औद्योगिक पार्क्स हे प्रकल्प उभारण्यात येणार आहेत. त्यासोबतच मेपल ट्री सोबत ३ हजार कोटींचा करार केला असून त्या माध्यमातून ते आपल्याकडे काही लॉजिस्टिक पार्क्स तयार करणार आहेत.

आज अतिशय महत्त्वाचे करार झालेले आहेत आणि हे डेटा सेंटर जे अतिशय विक्रमी वेळामध्ये त्यांनी पूर्ण केले आहे, असेही मुख्यमंत्री श्री.फडणवीस शेवटी म्हणाले.यावेळी सिंगापूरचे उपपंतप्रधान गन किम योंग म्हणाले की, आज नवी मुंबईमध्ये कॅपिटालँड डेटा सेंटर यशस्वीरित्या पूर्ण झाल्याबद्दल शुभेच्छा देण्यासाठी येथे उपस्थित राहून मला खूप आनंद होत आहे.

नवी मुंबई हे भारतातील एक महत्त्वाचे डिजिटल केंद्र बनत आहे, आणि मुंबई, चेन्नई, हैदराबाद आणि बंगळूरू यांसारख्या शहरांसोबत हे केंद्र भारताच्या डिजिटल अर्थव्यवस्थेचा कणा मजबूत करीत आहे.भारतात सध्या ८०० दशलक्षाहून अधिक इंटरनेट वापरकर्ते आणि मजबूत स्टार्टअप इकोसिस्टम आहे. त्यामुळे, डेटा सेंटरची मागणी पुढील काळात झपाट्याने वाढण्याची अपेक्षा आहे. भारतातील डेटा सेंटरची क्षमता सध्याच्या १.२ गिगा वॅटवरून २०३० पर्यंत ४.५ गिगा वॅटपर्यंत वाढण्याची शक्यता आहे.हे डेटा सेंटर कॅपिटालँडच्या भारतातील गुंतवणुकीचा एक भाग असून आम्हाला आनंद आहे की, कॅपिटालँडने महाराष्ट्र सरकारसोबत विविध प्रकल्पांमध्ये, जसे की बिझनेस पार्क्स, लॉजिस्टिक्स आणि इंडस्ट्रियल पार्क्समध्ये गुंतवणूक करण्यासाठी एक करार केला आहे. यामुळे कॅपिटालँड पुढील पाच वर्षांत महाराष्ट्रात २ अब्ज अमेरिकन डॉलर्सपेक्षा (सुमारे १६ हजार ६०० कोटी रुपये) जास्त गुंतवणूक करेल. हे गुंतवणुकीचे करार सिंगापूर आणि भारत यांच्यातील मजबूत आर्थिक संबंध दर्शवित आहेत. तसेच, भारत हे जगात सर्वात वेगाने वाढणाऱ्या अर्थव्यवस्थांपैकी एक असल्यामुळे सिंगापूरच्या कंपन्यांसाठीही येथे अनेक संधी निर्माण होत आहेत. उदाहरणार्थ, 'इंडिया-सिंगापूर डिजिटल अर्थव्यवस्थे'च्या करारानुसार, दोन्ही देशांच्या कंपन्यांमध्ये डिजिटल पेमेंट आणि फिनटेक क्षेत्रांत सहकार्य वाढविले जात आहे.

या संधींमुळे सिंगापूर आणि भारत यांच्यातील संबंध अधिक मजबूत होत आहेत. या नवीन डेटा सेंटरच्या माध्यमातून उद्योगांना, स्टार्टअप्सना आणि उद्योजकांना डिजिटल युगात नवीन संधी शोधण्यासाठी मदत करेल आणि भारताच्या डिजिटल अर्थव्यवस्थेच्या वाढीसाठी योगदान देईल, असेही ते शेवटी म्हणाले.याप्रसंगी कॅपिटालँड इंडियाचे मुख्य कार्यकारी अधिकारी संजीव दासगुप्ता म्हणाले की, भारत कॅपिटालँडसाठी एक प्रमुख बाजारपेठ आहे आणि महाराष्ट्र, त्याच्या मजबूत आर्थिक मूलभूत गोष्टी आणि सुविकसित आयटी आणि औद्योगिक संस्थांसह, आमच्यासाठी महत्त्वपूर्ण संधी उपलब्ध करून देत आहे. आम्ही महाराष्ट्राच्या व्यावसायिक आणि औद्योगिक विकासात आणखी योगदान देण्यास सदैव तयार आहोत.

# सण, उत्सव शांततेत साजरे करा - जिल्हाधिकारी कर्डिले

### पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्यावर भर; गणेश विसर्जन कृत्रिम तलावात करा

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१२, नांदेड :** गणेशोत्सव, ईद-ए-मिलाद व दहीहंडी हे सण येत्या काळात एकत्रित येत आहेत. जिल्ह्यात हे सण साजरे करतांना सर्व धर्मियांनी एकमेकात परस्पर सौहार्द व शांतता ठेवून साजरे करावेत. पर्यावरण संरक्षणासाठी नागरिकांनी पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्यावर भर द्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले. जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातील नियोजन भवन येथे आज शांतता समितीची बैठक संपन्न झाली. त्यावेळी ते बोलत होते.

बैठकीस जिल्हा पोलीस अधिक्षक अबिनाश कुमार, मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर तसेच विविध विभागाचे अधिकारी, कर्मचारी यासह शांतता समितीचे सदस्य व इतर सदस्यांची उपस्थिती होती. डिजेचा आवाजामुळे उत्सव काळात ध्वनी प्रदूषण मोठे होते. नागरिकांनी डीजे न लावता सण उत्सव साजरा करण्यावर भर द्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले. गणेशोत्सव साजरा करतांना पर्यावरण पूरक गणेशोत्सव करण्यावर भर द्यावा. नदीच्या वाहत्या प्रवाहात श्री गणेश मुर्तीचे विसर्जन न करता कृत्रिम तलावात करून नागरिकांनी प्रशासनाला सहकार्य करावे. सण उत्सवाच्या काळात नागरिक-मंडळाच्या अडचणी सोडविण्यासाठी प्रशासनाकडून व्हॉटसअपग्रुप तयार करण्यात येणार आहे. यात नागरिकांनी त्यांच्या अडचणी थोडक्यात मांडाव्यात अशा सूचना त्यांनी बैठकीत दिल्या.

**नागरिकांनी कायदा हातात घेवू नये : पोलीस अधिक्षक**

उत्सव काळात येणाऱ्या अडचणी सोडविण्यासाठी नागरिकांनी पोलीस प्रशासनास सहकार्य करावे. पोलीस प्रशासन नेहमी दक्ष असून नागरिकांनी योग्य माहिती द्यावी. उत्सव काळात येणाऱ्या अडचणी व्हॉटसअप ग्रुपच्या माध्यमातून तात्काळ सोडविण्यावर भर दिला जाईल. कोणत्याही नागरिकांनी कायदा हातात



घेऊ नये. उत्सव काळात गुन्हेगारीला आळा बसविण्यासाठी प्रशासनाच्यावतीने प्रतिबंधात्मक कार्यवाही करण्यात येत आहे. यासाठी चांगले नियोजन केले असून नागरिकांना कोणतीही अडचण होणार नाही याची काळजी प्रशानाकडून घेण्यात येत असल्याचे जिल्हा पोलीस अधिक्षक अबिनाश कुमार यांनी सांगितले.

**महापालिकेच्यावतीने विसर्जनाची तयारी पूर्ण: मनपा आयुक्त**

गणेशोत्सवाचे सुयोग्य नियोजन महापालिकेच्यावतीने केले आहे. मिरवणूक मार्गात कोणत्याही समस्या निर्माण होणार नाहीत याची काळजी घेण्यात येणार आहे. यावर्षी तीन ठिकाणी विसर्जनाची व्यवस्था करण्यात आली आहे. गोदावरी नदीत श्री गणेशाचे विसर्जन होणार नाही याची काळजी गणेश भक्तांनी घ्यावी. गोदावरी नदी शुद्ध ठेवण्यासाठी नागरिकांनी सहकार्य करावे असे आवाहन मनपा आयुक्त महेशकुमार डोईफोडे यांनी केले. शांतता समितीच्या सदस्यांनी गणेशोत्सव, दहीहंडी व ईद ए मिलाद या सणामध्ये येणाऱ्या अडचणी मांडल्या. त्या निवारण्यासाठी योग्य नियोजन करण्यात येईल, असे जिल्हा प्रशासनाच्यावतीने सांगितले. सण उत्सवाच्या काळात शांतता समितीचे सदस्य, सर्व सामाजिक नेत्यांनी आपापल्या गावात, नगरात शांतता राहील यासाठी स्वतः प्रयत्न करावे. तसेच प्रशासनाला सहकार्य करण्याचे आवाहनही यावेळी करण्यात आले.

# धारणगाव खडक व वीर येथे ग्राम सुरक्षा दलाची स्थापना

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.१२, विंचूर (नाशिक) :** मंगळवार, दि. १२ ऑगस्ट २०२५ रोजी पोलिस अधिक्षक नाशिक ग्रामीण बाळासाहेब पाटील व अप्पर पोलीस अधिक्षक, नाशिक ग्रामीण आदित्य मिरखेलकर यांचे संकल्पनेतून व उपविभागीय पोलीस अधिकारी निफाड के. के. पाटील यांचे मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक लासलगाव पोलीस स्टेशन भास्करराव शिंदे यांनी धारणगाव वीर व धारणगाव खडक गावात जनसंवाद अभियान योजना अनुषंगाने मीटिंग घेऊन नागरिकांचे अडचणी समजून घेतल्या. तसेच ग्रामीण भागातील होणाऱ्या चोऱ्यांना प्रतिबंध व्हावा यासाठी ग्रामसुरक्षा दल स्थापन करून त्यांना करावयाच्या उपाययोजना समजून सांगून लाठी व व्हिसल वाटप करण्यात आली.

यावेळी पोलीस कॉन्स्टेबल सागर आरोटे, पोलीस कॉन्स्टेबल अविनाश सांगळे तसेच धारणगाव गाव खडक सरपंच खंडू सोनवणे, पोलीस पाटील राहुल सोनवणे, धारणगाव वीर गावचे सरपंच दीपक सोनवणे, पोलीस पाटील शरद पुंड गावातील इतर प्रतिष्ठीत नागरिक व ग्रामस्थ हजर होते.

# भिवंडीत गुन्हे शाखेची मोठी कामगिरी; दोन सराईतांना अटक

## ३२ कोटींपेक्षा जास्त किमतीचा १७ किलो ९२४ ग्रॅम 'एम.डी.' अंमलीपदार्थ जप्त

**अक्षराज : विश्वनाथ शेनोय**

**दि.११, भिवंडी (ठाणे) :** ठाणे शहर पोलीस आयुक्तांच्या आदेशानुसार अंमलीपदार्थ विक्रीवर आळा घालण्यासाठी केलेल्या कारवाईत गुन्हे शाखा, घटक-२, भिवंडीच्या पथकाने महामार्गावर सापळा रचून दोन सराईत आरोपींना वाहनांसह अटक केली. त्यांच्या ताब्यातून तब्बल ३१,८४,८०,००० रुपयांचा १७ किलो ९२४ ग्रॅम मेफेड्रॉन (एम.डी.) हा अंमलीपदार्थ जप्त करण्यात आला. जप्त केलेल्या मुद्देमालाची एकूण किंमत ३२,२०,१०,१४० रुपये एवढी आहे. गुप्त माहितीच्या आधारे ९ ऑगस्ट रोजी दुपारी २ वाजता रांजनोली, भिवंडी बायपासजवळ नाशिक-ठाणे पूर्व द्रुतगती महामार्गावर पथकाने नाकेबंदी केली. या



कारवाईत तन्वीर अहमद कमर अहमद अन्सारी (२३, भिवंडी) याच्याकडील स्विफ्ट डिझायर कारमधून ११ किलो ७६३ ग्रॅम एम.डी. तर महेश हिंदुराव देसाई (३५, कोल्हापूर) याच्याकडील इचथ कारमधून ४ किलो १६१ ग्रॅम एम.डी.जप्त करण्यात आला.

**जप्त मुद्देमालात समाविष्ट :-**

मेफेड्रॉन (एम.डी.) – १७ किलो ९२४ ग्रॅम, किंमत ₹३१,८४,८०,०००/-

स्विफ्ट डिझायर कार – ₹५ लाख

इचथ कार – ₹३० लाख

३ मोबाईल फोन – ₹२२,०००/-

रोकड – ₹८,१४०/-

दोन्ही आरोपींविरुद्ध कोनगाव पोलीस ठाण्यात छूझड कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून न्यायालयाने त्यांना १३ ऑगस्टपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. दोन्ही आरोपींवर यापूर्वी अनेक गंभीर गुन्हे नोंद असून, ते ठाणे-मुंबई परिसरात अंमलीपदार्थ विक्रीसाठी आले असल्याची माहिती तपासात समोर आली आहे. उर्वरित पाहिजे आरोपी व अंमलीपदार्थाचा पुरवठा साखळीबाबत तपास सुरू आहे. ही कारवाई पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे, सह पोलीस आयुक्त ज्ञानेश्वर चव्हाण, अपर पोलीस आयुक्त पंजाबराव उगले, पोलीस उप आयुक्त अमरसिंह जाधव, सहा. पो. आयुक्त शेखर वागडे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक जनार्दन सोनवणे यांच्या पथकाने केली.

# ऐरोली विभागात अनधिकृत बांधकामावर धडक कारवाई



**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.१२, नवी मुंबई :** महापालिकेच्या अतिक्रमण विभागाच्या वतीने नोटीस देऊन ही संबधितांनी नोटिशीची दखल न घेतल्यामुळे अनधिकृत बांधकामाविरोधात नवी मुंबई महानगरपालिका विभागामार्फत आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार व अतिरिक्त आयुक्त (२) डॉ. राहुल गेठे व उप आयुक्त (अतिक्रमण) डॉ.कैलास गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली अतिक्रमण विभागाने ऐरोली विभागात निष्कासनाची कारवाई करण्यात आली. नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील जी विभाग ऐरोली कार्यालया अंतर्गत चंद्राबाई हाईटच्या बाजूला, से-०२, ऐरोली, नवी मुंबई व समृद्धी हॉटेल, प्लॉट नं-२२, से-०१, ऐरोली, नवी मुंबई येथे विनोद कांबळे व विनोद छगनभाई जजोरिया यांनी बांधकाम परवानगी व्यतिरिक्त अनधिकृतपणे बांधकाम सुरु केले होते.

विनोद कांबळे, चंद्राबाई हाईटच्या बाजूला, से-०२, ऐरोली, नवी मुंबई व विनोद छगनभाई जजोरिया, समृद्धी हॉटेल, प्लॉट नं- २२, से-०१, ऐरोली, नवी मुंबई यांनी केलेल्या अनधिकृत बांधकामास जी विभाग कार्यालयामार्फत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ मधील कलम ५२ (१अ)/ ५४ अन्वये नोटीस बजाविण्यात आलेल्या आहेत. संबधितांनी केलेले अनधिकृत बांधकाम स्वतःहून हटविणे आवश्यक होते. परंतु त्यांनी अनधिकृत बांधकाम सुरु ठेवले होते. सदर परवानगी व्यतिरिक्त करण्यात आलेले अनधिकृत बांधकाम निष्कासित करण्यात आले.

तसेच सदर कारवाई अंतर्गत सदर बांधकाम धारकाकडून प्रती ५०,०००/- रूपये प्रमाणे एकूण रु. १,००,०००/- दंडात्मक शुल्क वसूल करण्यात आले आहे. तसेच से-०९, ऐरोली, घणसोली-ऐरोली, येथील महामार्गातील अडथळा ठरत असलेल्या, पाण्याच्या टाकी जवळील अनधिकृतपणे उभारण्यात आलेल्या झोपडपट्ट्या निष्कासित करण्यात आलेल्या आहेत. सदर धडक मोहिमेसाठी जी-विभाग कार्यालयाचे सहाय्यक आयुक्त तथा विभाग अधिकारी सुनिल काठोळे, कार्यालयातील अतिक्रमण विभागाचे अधिकारी / कर्मचारी, मजूर, जेसीबी, ब्रेकर, गॅसकटर तसेच अतिक्रमण विभागाचे पोलिस तैनात होते. यापुढे देखील अशा प्रकारे अतिक्रमण विरोधी कारवाई तीव्र करण्यात येणार आहे.

# चंद्रपूर नगरीत 'भाऊंची दहीहंडी उत्सव' आणि 'भव्य वेशभूषा स्पर्धेचे' आयोजन

## गोविंदा पथकांसाठी प्रथम पारितोषिक १ लाख ५१ हजार रोख रक्कम

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१२, चंद्रपूर :** चंद्रपूर जिल्ह्यातील नागरिकांना एक मोठा आणि उत्साहपूर्ण उत्सव अनुभवता यावा. यासाठी 'द मराठा चॅरिटेबल ट्रस्ट' आणि 'बाळूभाऊ धानोरकर मित्र परिवार' यांच्या वतीने यावर्षी 'भाऊंची दहीहंडी उत्सव' आणि लहान मुलांसाठी 'भव्य वेशभूषा स्पर्धा' चे भव्य आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम येत्या दिनांक १७ ऑगस्ट २०२५ रोजी न्यू इंग्लिश हायस्कूल मैदान, वरोरा नाका चौक, चंद्रपूर येथे संपन्न होणार आहे.

हा उत्सव केवळ दहीहंडीपुरता मर्यादित नसून, यात लहान मुलांच्या




कलागुणांना वाव देणाऱ्या स्पर्धेची भर घालण्यात आली आहे. दहीहंडीचा मुख्य कार्यक्रम सायंकाळी ४ वाजता सुरू होईल.

या स्पर्धेत सहभागी होणाऱ्या गोविंदा पथकांसाठी प्रथम पारितोषिक म्हणून १ लाख ५१ हजार रोख रक्कम आणि एक चषक ठेवण्यात आले आहे. स्पर्धेत सहभागी होण्यासाठी इच्छुक संघांनी १५ ऑगस्ट २०२५ रोजी सायंकाळी ६ वाजेपर्यंत नोंदणी करणे आवश्यक आहे.

या कार्यक्रमासोबतच, ५ ते १० वर्षे वयोगटातील मुलांसाठी एक विशेष 'भव्य वेशभूषा स्पर्धा' आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेचे विषय भारतीय संस्कृती आणि भारतीय इतिहासातील महापुरुष असे ठेवण्यात आले आहेत. लहान मुलांना त्यांच्या कलागुणांना वाव देण्याकरिता ही एक उत्तम संधी आहे. या स्पर्धेतील विजेत्यांना आकर्षक पारितोषिके दिली जातील. ज्यात प्रथम बक्षीस ५ हजार, द्वितीय ३ हजार, तृतीय २ हजार आणि १० उत्तेजनार्थ बक्षिसे देण्यात येतील.

दोन्ही कार्यक्रमांच्या अधिक माहितीसाठी आणि नावनोंदणीसाठी कृपया ७९७२३६९०४५ या क्रमांकावर संपर्क साधावा. सदर कार्यक्रम खासदार प्रतिभा धानोरकर यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आले आहेत. आम्ही चंद्रपुर जिल्ह्यातील सर्व नागरिकांना, विशेषतः गोविंदा पथक व बालकांना या उत्साहात सहभागी होण्याचे आणि कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आवाहन करते.

# राज्य सरकारी कर्मचारी संघटनेचे धरणे आंदोलन

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.११, चंद्रपूर :** राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटनेच्यावतीने प्रलंबित मागण्यांकडे शासनाचा लक्षवेध करुन घेण्यासाठी सोमवार, दि. ११ ऑगस्ट २०२५ ला चंद्रपूर येथे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर जोरदार निदर्शने देऊन चेतना दिन साजरा केला. चेतना दिनी समन्वय समितीच्या माध्यमातून या वर्षी शिक्षण व आरोग्य विभागासाठी राज्यातील कर्मचारी – शिक्षक एकजुट दाखविण्यासाठी तसेच पुढील वर्षी दुसऱ्या दोन घटक संघटनांचे प्रश्न घेतले जातील व अशाप्रकारे या चेतना दिनाची मशाल आपल्याला कायम तेवत ठेवण्यासाठी व प्रलंबित २१ मागण्यांसोबतच दि.२७ जुन २०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये चंद्रपूर जिल्ह्यातील नक्षलग्रस्त, आदिवासी क्षेत्रातील 'एकस्तर पदोन्नती व प्रोत्साहन भत्ता' बंद करण्यात आलेला आहे. त्याअनुषंगाने जिल्ह्यातील 'एकस्तर पदोन्नती व प्रोत्साहन भत्ता' पूर्ववत सुरु राहण्याकरीता शासनाने आजपर्यंत सुधारीत शासन निर्णय निर्गमित केलेला नाही. शिक्षण व आरोग्य विभागाच्या समस्येकडे सातत्याने दुरलक्ष केले जात आहे.

त्यामुळे शिक्षण व आरोग्य विभागाच्या स्तप्त कर्मचाऱ्यांनी जिल्हाधिकारी कार्यालय, चंद्रपूर समोर 'धरणे आंदोलन' करुन शासनाचा लक्षवेध करुन घेण्यासाठी जोरदार निदर्शने दिली. या प्रसंगी राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटनेचे अध्यक्ष दिपक जेऊरकर, राजू धांडे यांनी प्रलंबित मागण्यां संदर्भात उरस्थित कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन केले. या आंदोलनाचे संचालन श्रीकांत येवले, यांनी केले तसेच आभार प्रदर्शन चंद्रकांत कोतपल्लीवार यांनी केले. या धरणे आंदोलनात दिपक जेऊरकर, राजु धांडे, श्रीकांत येवले, अविनाश बोरगमवार, सिमा पॉल, रजनी आनंदे व इतर सर्व शासकीय कार्यालयीन संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी सहभाग दर्शविला होता.

# पांढरकवडा येथे शालेय मंत्रिमंडळाचा पदग्रहण व शपथविधी सोहळा




**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१२, चंद्रपूर :** दि.एज्युकेशन सोसायटी चंद्रपुर द्वारा संचालित न्यू इंग्लिश हायस्कूल तथा कनिष्ठ महाविद्यालय पांढरकवडा येथे प्राचार्या डॉ.शुक्ला यांच्या मार्गदर्शनाखाली सत्र २०२५ – २६ साठी शाळेत निवडणूक आयोगाच्या निवडणूक प्रक्रियेनुसार घेतलेल्या निवडणुकीत निवडून आलेल्या प्रतिनिधींना प्राचार्या डॉ.शुक्ला यांच्या हस्ते पुष्पगुच्छ व मानचिन्ह देवुन सन्मानित करण्यात आले व त्यांना त्या – त्या मंत्री पदाची विधीवत शपथ देण्यात आली.

शालेय मंत्रिमंडळ मुख्यमंत्री कु.यामिनी विजय वरारकर, उपमुख्यमंत्री शंकर बावणे, शिक्षणमंत्री कु.ज्योत्स्ना विलास पचारे, कु.प्रिया भारत सोनटक्के, वित्तमंत्री कु. क्रीष्टी नरेंद्र पडवेकर, सांस्कृतिक मंत्री कु.मयुरी काशीनाथ बरडे, वीर चरणदास बोबडे, क्रीडामंत्री महादेव सचिन सातपुते, शिवम जीवनदास संदोकार, पर्यावरणमंत्री नरेंद्र दादाजी गाडगे, शिवम दिवाकर जोगी, सहल मंत्री प्रथमेश उत्तम मासिरकर, ओम संजय बावणे, आरोग्यमंत्री कु.आराध्या अविनाश गोहणे, कु.रिया विकास जुनघरे, स्वच्छतामंत्री नैतिक संजय सोनेकर या सर्व शालेय मंत्रिमंडळातील विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन करून शालेय परिसरात बँड ताशाच्या गजरात विजयोत्सव साजरा करण्यात आला. प्राचार्या डॉ.शुक्ला यांनी सर्व निर्वाचित मंत्र्यांना पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमात सर्व विद्यार्थ्यी, शिक्षक, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# थोडक्यात

## ध्वजारोहणाचा भादाणे पॅटर्न ठरला राज्यातील यशस्वी प्रयोग

**अक्षराज : सुनिल फर्डे**

**दि.१३, शहापूर (ठाणे) :** राज्यात प्रथमच ठाणे जिल्ह्यातील भादाणे गावातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत १५ ऑगस्ट २०१५ रोजी सरपंच व त्याच शाळेचे शिक्षण कमिटीचे अध्यक्ष संजय हांडोरे पाटील यांनी शिक्षण क्षेत्रात क्रांतिकारी निर्णय घेऊन अनुक्रमे स्वातंत्र्यदिन व प्रजासत्ताक दिनाचा ध्वजारोहणाचा मान इयत्ता दहावी व बारावीला प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या निवासी किंवा अनिवासी विद्यार्थांच्या हस्ते व त्यांच्या आई वडिलांच्या सोबत देण्यात आला. या निर्णयाचे स्वागत संपूर्ण राज्यभर होत असून अनेक सामाजिक व राजकीय संघटनांनी राज्य सरकारकडे मागणी केली आहे की, हा पॅटर्न संपूर्ण राज्यात लागू करावा. डिसेंबर २०२३ रोजी ठाणे जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेने या भादाणे पॅटर्नचे खूप कौतुक झाले असून, हा पॅटर्न राज्यात लागू करावा म्हणून जिल्हा परिषद ने तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना सर्वसंमतीने ठराव पाठविला होता. या अनोख्या निर्णयामुळे विद्यार्थांच्या गुणवत्ता विकासाला चालना मिळाल्याने, गावातील ध्वजारोहण करण्यावरून होणारी राजकीय भांडणे थांबली गेली व एक निकोप आदर्श शैक्षणिक स्पर्धा वाढीस लागली आहे. हा निर्णय शाळेच्या शिक्षण कमिटी व ग्रामसभेत सर्व मताने घेण्यात आला असून हा निर्णय लागू करताना तत्कालीन मुख्याध्यक राजाराम कंटे यांचे मोलाचे सहकार्य लाभले होते. या वर्षी (१५ ऑगस्ट २०२५) भादाणे गावाचा २० वा विद्यार्थी या ध्वजारोहणाचा मान घेत आहे. देशभरात या भादाणे ध्वजारोहण या अनोख्या उपक्रमाचे स्वागत होत असून उत्तर प्रदेश सरकारचे शिक्षण मंत्री यांनी माजी आशिषजी पटेल यांनी ४ फेब्रुवारी २०२४ रोजी संजय हांडोरे पाटील यांना लखनऊ येथे आमंत्रित करून या अनोख्या ध्वजारोहण उपक्रमांचे कौतुक करून त्यांचा यथोचित सत्कार केला होता.

## मंदिरातील समाध्या विटंबना प्रकरणी पोलीस निरीक्षक यांची स्थळाला भेट



**अक्षराज : बालासाहेब फुलपगार**

**दि.१२, पालम (परभणी) :** पालम तालुक्यातील श्री क्षेत्र सोमेश्वर येथील गोदावरी नदी पात्रा वरील सोमनाथ महादेव मंदिर परिसरातील ३ समाध्या जेसीबीने बुजवून विटंबना केली. या तक्रारदाराच्या अर्जाची दखल घेत मंगळवार, दिनांक १२ ऑगस्ट २०२५ रोजी सायंकाळी जायमोक्यावर जाऊन पोलीस निरीक्षकांनी चौकशी सुरू केली आहे. पोलीस निरीक्षक शेषराव खटाणे सोमेश्वर महादेव मंदिर परिसरात आल्यानंतर तक्रारदार व ज्यांच्यावर समाधी विटंबनेचे आरोप आहेत ते दोघेही हजर होत दोघांनीही आपापल्या बाजू मांडल्या. प्रत्यक्ष स्थळावर दोन्ही बाजूकडील प्रत्येकी तीन तीन जणांची बाजू ऐकून घेत दोघांना ही संबंधित जागेबाबत आवश्यक ते कागदपत्रे घेऊन प्रत्यक्ष पालम पोलीस ठाण्यामध्ये हजर राहण्याच्या व सदरील धार्मिक स्थळावरील वातावरण शांततेत राखण्याच्या सूचना दिल्या.

## सोनवडी गजवडी विद्यालयात कराटे स्पर्धांचे बक्षीस वितरण



**अक्षराज : बाळू धायगुडे**

**दि.१२, सातारा :** श्री समर्थ एज्युकेशन सोसायटी सोनवडी गजवडी संचलित श्रीमंत छ.अभयसिंहराजे भोसले विद्यालय व ज्युनिअर कॉलेज सोनवडी गजवडी विद्यालयात महाराष्ट्र शेतोकॉन कराटे ऑर्गनायझेशन सातारा तर्फे सर्व कराटे स्पर्धत यशस्वी खेळाडू यांचे प्रशस्तीपत्र व शिल्ड देऊन सत्कार करण्यात आले. यावेळी नॅशनल इंटरनॅशनल स्पर्धत भाग घेणाऱ्या स्पर्धकांचा परळी विभागाचे माजी जि.प.सदस्य राजूभैय्या भोसले यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी संस्थेचे पदाधिकारी उपाध्यक्ष इसुबभाई पटेल कोल्हापूर शारीरिक शिक्षक संघटनेचे अध्यक्ष आर.वाय जाधव, महेश कदम उपसरंपच सोनवडी, धनाजी कदम उपसरपंच गजवडी, कल्याण शिंदें , भिकुभाऊ भोसले, रामभाऊ जानकर, सोनवडी गजवडी, कारी विद्यार्थी पालक उपस्थित होते. कराटे स्पर्धेचे नियोजन प्रशिक्षक कृष्णात खामकर व ज्योती खामकर यांनी केले. कु.प्रियांका कारंडे यांनी सुत्रसंचालन केले. विद्यालयाचे प्राचार्य मोरे यांनी आभार मानले.

## एमडी पावडर बाळगणारा आरोपी ताब्यात; ८५ हजारांचा मुद्देमाल जप्त



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.११, चंद्रपूर :** चंद्रपूर येथील नेताजी चौक बाबूपेठ परिसरातून एक व्यक्ती एमडी हा अंमली पदार्थ दुचाकीवर नेत असल्याची माहिती पोलिसांना मिळताच त्यांनी सापळा रचून दुचाकीस्वार अविनाश अनुप कुंडू (१८) रा. बाबुपेठ वार्ड याला ताब्यात घेण्यात आले. सदर कारवाई दिनांक १० ऑगस्ट रोजी करण्यात आली. आरोपीकडून ६.८५ ग्रॅम एमडी पावडरसह ८५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपीविरुद्ध पोस्टे चंद्रपूर शहर येथे एन.डी.पी.एस ॲक्ट अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. गुन्ह्याचा पुढील तपास चंद्रपूर शहर पोलीस करीत आहे.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अप्पर पोलीस अधीक्षक ईश्वर कातकडे, उपविभागीय पोलीस अधिकारी, चंद्रपूर सुधाकर यादव यांचे मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक निशीकांत रामटेके यांचे नेतृत्वात सपोनि राजेंद्र सोनवणे, पोउपनि दत्तात्रय कोलटे, विलास निकोडे, म.पो.हवा. भावना रामटेके, पो.हवा.सचिन बोरकर, लक्ष्मण रामटेके, संजय धोटे, निकेश ढेंगे, जावेद सिद्दीकी, नापोशि. कपुरचंद खरवार, पो.अं.योगेश पिदूरकर, निलेश ढोक, विक्रम मेश्राम, रुपेश पराते, मपोशि. सारिका गौरकार, दिपीका झिंगरे यांनी केलेली आहे. जिल्ह्यात अंमली पदार्थाचे जाळे मोठ्या प्रमाणात पसरले असून तरुणाई याकडे ओढल्या गेली आहे. त्यामुळे पोलिसांनी अश्या तस्करांविरुध्द कारवाई करण्याची मोह्म उघडण्यात आली आहे.